# ८. उद्योग

**प्रश्न १. अचूक पर्यायांसमोरील चौकटींत अशी खूण करा.**

**(अ) औद्योगिक विकासावर खालीलपैकी कोणता घटक प्रत्यक्ष परिणाम करत नाही?**
(i) पाणी
(ii) वीज
(iii) मजूर
**(iv) हवा ✔**

**(आ) खालीलपैकी कोणता उद्योग हा लघुउद्योग आहे?**
(i) यंत्रसामग्री उद्योग
**(ii) पुस्तकबांधणी उद्योग ✔**
(iii) रेशीम उद्योग
(iv) साखर उद्योग

**(इ) खालीलपैकी कोणत्या शहरात माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र नाही?**
**(i) जुनी दिल्ली ✔**
(ii) नवी दिल्ली
(iii) नोएडा
(iv) बंगळूरू

**(ई) उद्योगांना नफ्यातील दोन टक्के रक्कम कशासाठी वापरणे अनिवार्य आहे?**
(i) आयकर
**(ii) उदयोगांचे सामाजिक दायित्व ✔**
(iii) वस्तू व सेवा कर
(iv) विक्री कर

**प्रश्न २. खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा. असत्य विधाने दुरुस्त करा.**

**(अ) देशातील लघु व मध्यम उद्योग अवजड उद्योगांना मारक ठरतात.**
**उत्तर:** अयोग्य.
**दुरुस्त विधान:** देशातील लघु व मध्यम उद्योग अवजड उद्योगांना पूरक ठरतात.

**(आ) देशातील कारखानदारी देशाच्या आर्थिक विकासाचे निर्देशक आहे.**
**उत्तर:** योग्य.

**(इ) औद्योगिक विकास महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश उद्योगधंदयांचे विकेंद्रीकरण करणे हा आहे.**
**उत्तर:** योग्य.

**(ई) उद्योगांचे सामाजिक दायित्व हे प्रत्येक उद्योगधंद्यासाठी अनिवार्य आहे.**
**उत्तर:** अयोग्य.
**दुरुस्त विधान:** उदयोगांचे सामाजिक दायित्त्व हे प्रत्येक उदयोगांसाठी अनिवार्य नाही.

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार ओळींत लिहा.**

**(अ) औद्योगिक क्षेत्रासाठी सरकारकडून कोणकोणत्या सुविधा उपलब्ध होतात?**
**उत्तर:** औद्योगिक क्षेत्रासाठी सरकारकडून पुढील सुविधा उपलब्ध होतात:
(१) औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना सरकारकडून वीज, पाणी, कर यांमध्ये सवलती दिल्या जातात.
(२) औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना सरकारकडून सवलतीच्या दरात जमीन उपलब्ध करून दिली जाते.

**(आ) औद्योगिक विकासाचा राष्ट्रीय विकासावर कसा परिणाम होतो हे तुमच्या शब्दांत लिहा.**
**उत्तर:** (१) औदयोगिक विकासामुळे रोजगाराची पातळी वाढते.
(२) देशातील लोकांना रोजगार मिळाल्यामुळे दरडोई उत्पन्नात वाढ होते व परिणामी लोकांचे राहणीमान उंचावते.
(३) औदयोगिक विकासामुळे देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.
(४) देशातील उत्पादित वस्तूंची निर्यात केली असता, त्यापासून देशाला परकीय चलन प्राप्त होते. अशा प्रकारे, औद्योगिक विकासाचा राष्ट्रीय विकासावर परिणाम होतो.

**(इ) उदयोगांच्या सामाजिक दायित्वाच्या उपयुक्तेबाबत तुमचे मत थोडक्यात व्यक्त करा.**
**उत्तर:** (१) समाजातील मोठ्या प्रमाणावर नफा कमवणाऱ्या उद्योजकांनी अथवा उद्योग समूहाने आपल्या नफ्यातील काही टक्के रक्कम समाजहितोपयोगी कार्यासाठी खर्च करणे, म्हणजे 'सामाजिक दायित्व' होय.
(२) उदयोगांच्या सामाजिक दायित्वात उद्योजक अथवा उद्योग समूह (अ) शैक्षणिक किंवा आरोग्यविषयक सुविधा पुरवू शकतात. (ब) समाजातील निराधारांसाठी, अपंगांसाठी, गरजू व्यक्तींसाठी मार्गदर्शन केंद्रे चालवू शकतात. (क) एखादे गाव दत्तक घेऊन त्या गावाच्या विकासास हातभार लावू शकतात. (ड) पर्यावरणीय विकास केंद्रे उभारू शकतात.
(३) उदयोगांच्या सामाजिक दायित्वामुळे परिसरातील लोकांच्या कल्याणात भर पडू शकते.

**(ई) लघुउद्योगाची तीन वैशिष्ट्ये सांगा.**
**उत्तर:** लघुउद्योगाची तीन वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:
(१) लघुउद्योगांना भांडवल, जागा, यंत्रसामग्री या आदानांची तुलनेने कमी प्रमाणात आवश्यकता असते.
(२) लघुउद्योगात तुलनेने कमी मनुष्यबळ आवश्यक असते.
(३) लघुउद्योगातील उत्पादित वस्तूंची बाजारपेठ तुलनेने मर्यादित असते.

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**(अ) औद्योगिक विकासावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**
**उत्तर:** औद्योगिक विकासावर परिणाम करणारे घटक पुढीलप्रमाणे होत:
(१) प्राकृतिक रचना, कच्चा माल, मनुष्यबळ, पाणीपुरवठा, वाहतुकीच्या सोयीसुविधा, भांडवल, बाजारपेठ, शासकीय धोरणे, राजकीय परिस्थिती इत्यादी घटक एखादया प्रदेशातील/देशातील औद्योगिक विकासावर परिणाम करतात.

(२) उदा., घनदाट वनप्रदेश, पर्वतीय प्रदेश, वाळवंटी प्रदेश इत्यादी ठिकाणी प्रतिकूल प्राकृतिक रचनेमुळे आणि वाहतुकीच्या सोयीसुविधा मर्यादित प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे औदयोगिक विकास पुरेशा प्रमाणात होत नाही.
(३) उदा., सुपीक मैदानी प्रदेशात शेती व्यवसायाची भरभराट होते. शेतमाल इतर अनेक व्यवसायांत कच्चा माल म्हणून उपयोग होत असल्यामुळे अशा प्रदेशात इतर उदयोगांच्या विकासास चालना मिळते.

**(आ) महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाचे फायदे लिहा.**
**उत्तर:** (१) महाराष्ट्र राज्य औदयोगिक विकास महामंडळाची स्थापना १ ऑगस्ट १९६२ रोजी झाली.
(२) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाद्वारे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्राची निर्मिती करण्यात आली आहे.
(३) या औदयोगिक क्षेत्रातील उदयोगांना सरकारकडून जमिनीचे दर, वीज, पाणी, कर यांमध्ये सवलती दिल्या जातात. त्यामुळे औदयोगिकीकरणास चालना मिळते.
(४) प्रत्येक जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाद्वारे औद्योगिक क्षेत्राची निर्मिती करण्यात आली असल्यामुळे उदयोगांच्या विकेंद्रीकरणास चालना मिळते.
(५) महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ राज्यातील रोजगार पातळी, व्यापार व लोकांचे राहणीमान उंचावण्यात महत्त्वपूर्ण ठरते.

**(इ) माहिती तंत्रज्ञान उद्योगाचे महत्त्व सांगा.**
**उत्तर:** (१) माहिती तंत्रज्ञान उदयोगात माहिती शोधणे, माहिती मिळवणे, माहितीचे विश्लेषण करणे, माहिती संग्रहित करणे, मागणीनुसार माहिती पुरवणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. परिणामी माहिती तंत्रज्ञान उदयोगांद्वारे जगातील कोणत्याही व्यक्तीला जगातील कोणत्याही गोष्टीची सहजपणे माहिती उपलब्ध होऊ शकते.
(२) माहिती तंत्रज्ञान उदयोगात संगणक, इंटरनेट, मोबाईल फोन इत्यादी साधनांचा माहितीशी संबंधित कार्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या साधनांद्वारे तुलनेने कमी खर्चात, कमी वेळेत आणि कमी कष्टात आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकते.
(३) माहिती तंत्रज्ञान उदयोगातून मिळालेल्या माहितीच्या आधारे वैयक्तिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगती करणे शक्य होते.

**(ई) भारतातील लोकसंख्येचा विचार करता उद्योग निर्मिती हा बेरोजगारेवरील एक चांगला उपाय आहे. स्पष्ट करा.**
**उत्तर:** (१) २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या २०११ साली सुमारे १२१ कोटी होती.
(२) भारतातील बहुतांश लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे व भारतातील बहुतांश शेती हंगामी स्वरूपाची आहे. परिणामी भारतातील लोकसंख्येत बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. म्हणून भारतात मोठ्या प्रमाणावर उद्योगनिर्मिती करणे अत्यावश्यक आहे.
(३) भारतात मोठ्या प्रमाणावर लघुउद्योग आणि मध्यम उद्योग निर्माण केले असता, बेरोजगार व्यक्तींना, स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
(४) भारतात मोठ्या प्रमाणावर मोठ्या उद्योग निर्माण केले असता, नागरीकरणास चालना मिळेल व ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे लोकसंख्येचे अति प्रमाणातील स्थलांतर थांबवणे शक्य होईल, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल व परिणामी बेरोजगारीचे दुष्टचक्र भेदणे शक्य होईल.

**प्रश्न ५. खालील विधानासाठी ओघतक्ता तयार करा.**

**(अ) आपण जे कपडे वापरतो त्यांचा शेतापासून आपल्यापर्यंत झालेला प्रवास लिहा.**
**उत्तर:**




**(ब) एखादया उदयोगाच्या स्थानिकीकरणासाठी आवश्यक घटक लिहा.**
**उत्तर:**




**प्रश्न ६ फरक स्पष्ट करा.**

**(अ) मध्यम उद्योग - अवजड उद्योग**
**उत्तर:**

| मध्यम उद्योग | अवजड उद्योग |
|---|---|
| **आदानांचे प्रमान** | **आदानांचे प्रमान** |
| अवजड उदयोगांच्या तुलनेत मध्यम उदयोगांना कमी प्रमाणात भांडवल, जागा, मनुष्यबळ, यंत्रसामग्री आवश्यक असते. | मध्यम उदयोगांच्या तुलनेत अवजड उद्योगांना मोठ्या प्रमाणात भांडवल, जागा, मनुष्यबळ, यंत्रसामग्री आवश्यक असते. |
| **उदाहरणे** | **उदाहरणे** |
| फळप्रक्रिया उद्योग, गुन्हाळ इत्यादी मध्यम उद्योगाची उदाहरणे आहेत. | साखरनिर्मिती, कापडनिर्मिती, वाहननिर्मिती, औषधनिर्मिती इत्यादी अवजड उद्योगाची उदाहरणे आहेत. |

**(आ) कृषीपूरक उद्योग - माहिती तंत्रज्ञान उद्योग**
**उत्तर:**

| कृषीपूरक उद्योग | माहिती तंत्रज्ञान उद्योग |
|---|---|

| | |
|---|---|
| **स्थानिकीकरण** | **स्थानिकीकरण** |
| सर्वसाधारणपणे कृषीपूरक उदयोगांचे ग्रामीण भागात स्थानिकीकरण आढळते. | सर्वसाधारणपणे माहिती तंत्रज्ञान उदयोगाचे नागरी भागात स्थानिकीकरण आढळते. |
| **सवरूप** | **सवरूप** |
| कृषीपूरक उदयोगांचा पारंपरिक उदयोगांत समावेश होतो. | माहिती तंत्रज्ञान उदयोगांचा आधुनिक उदयोगांत समावेश होतो. |